**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:18.04.2025** **वार:शुक्रवार**

---

1. वक्फ कायद्यासंदर्भात पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड किंवा वक्फ परिषदेवर कोणतीही नियुक्ती करणार नाही- केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयासमोर हमी
2. सर्वोच्च न्यायालयानं अलीकडेच दिलेल्या निर्णयावर उपराष्ट्रपतींकडून खंत व्यक्त
3. राज्य शासनाचा व्ही शांताराम जीवन गौरव पुरस्कार महेश मांजरेकर यांना; तर गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना जाहीर आणि
4. राज्यपाल सी पी राधाकृष्णन आज पुण्यात शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्रदान करणार

**<u>वक्फ सुप्रीम कोर्ट</u>**

वक्फ दुरुस्ती कायदा, 2025 संदर्भात पुढील सुनावणी होईपर्यंत, म्हणजे येत्या 5 मे पर्यंत केंद्र सरकारकडून वक्फ मंडळावर अथवा केंद्रीय वक्फ परिषदेवर कोणत्याही नवीन नियुक्त्या केल्या जाणार नाहीत तसंच वक्फच्या वापरात असलेल्या जागांसह सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व वक्फ मालमत्तांचा दर्जाही काही काळ जैसे थे राहील असे हंगामी आदेश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठानं हे आदेश दिले आहेत. या खंडपीठानं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्याकडून वक्फ मंडळांवर नियुक्त्या केल्या जाणार नाहीत अशी हमीही घेतली आहे.

1995 च्या वक्फ कायद्यात अलीकडेच करण्यात आलेल्या सुधारणांना स्थगिती द्यावी अशी मागणी करणाऱ्या किंवा नव्या सुधारित कायद्याच्या दुरुस्तीला आव्हान देणाऱ्या याचिकांवर केंद्रानं सात दिवसात उत्तर द्यावं असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. वक्फ कायद्याबाबत खूप मोठ्या संख्येनं याचिका दाखल झाल्या असल्यामुळे खंडपीठानं याचिकाकर्त्यांना ज्यांची न्यायालयात सुनावणी होण्याची आवश्यकता आहे अशा पाच प्रमुख याचिकांची निवड करण्यास सांगितलं आहे. दरम्यान नवीन वक्फ सुधारणा कायदा अंमलात आणल्याबद्दल दाऊदी बोहरा मुस्लिम समाजानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

**<u>धनखड प्रतिक्रिया</u>**

राष्ट्रपतींनी विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी ठराविक मुदत निर्धारित करावी या सर्वोच्च न्यायालयानं अलीकडेच दिलेल्या निर्णयाबद्दल उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी खंत व्यक्त केली आहे. काल नवी दिल्लीत राज्यसभा प्रशिक्षणार्थींच्या सहाव्या तुकडीला त्यांनी संबोधित केलं. जिथे न्यायमूर्ती कायदे करतील, कार्यकारी कार्ये करतील, सुपर पार्लमेंट म्हणून काम करतील अशा पद्धतीच्या लोकशाहीसाठी भारतानं संघर्ष केला नव्हता, असं उपराष्ट्रपती म्हणाले. अधिकारांच्या विभागणीचं तत्त्व स्पष्ट करताना ते म्हणाले की जेव्हा लोकांनी निवडून दिलेले सरकार असतं तेव्हा त्यांना प्रश्न विचारता यावेत यासाठी संसद उत्तरदायी असते. पण न्यायालयाच्या अशा कार्यकारी कारभारात लोकांना प्रश्न कसे उपस्थित करता येऊ शकतील, निवडणुकांची जबाबदारी कोणाकडे असेल, असा प्रश्नही त्यांनी केला. अधिकारांचा वापर करताना अत्यंत संवेदनशील असण्याची गरज धनखड यांनी अधोरेखित केली.

**सीतारामन मुंबई**

शेअर बाजारातल्या गुंतवणूकदारांनी संपत्ती निर्मितीचं दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवावं. त्यासाठी पूर्ण माहिती घेऊन आणि संयमाने निर्णय घ्यावेत असा सल्ला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिला आहे. मुंबई शेअर बाजाराच्या दीडशेव्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत झालेल्या कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. कंपन्यांनी पारदर्शकता, व्यवस्थापनात व्यावसायिकता ठेवावी, नियामकांनी तत्पर रहावं आणि बाजारांनी गुंतवणूकदार केंद्री सुधारणा कराव्यात असं आवाहन त्यांनी केलं. देशातल्या नागरिकांच्या वित्तीय सक्षमीकरणासाठी सरकार कटीबद्ध आहे. वित्तीय यंत्रणेच्या वाढीच्या प्रक्रियेत सर्वांना सहभागी होण्याची आणि विकासाची संधी दिली जाईल. त्यात कुठलाही भेदभाव केला जाणार नसल्याची ग्वाही अर्थमंत्र्यांनी दिली.

**कोचिंग क्लास नोटिसा**

केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं आय आय टी-जे इ इ, नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांचं प्रशिक्षण देणाऱ्या काही कोचिंग क्लासेसना विद्यार्थ्यांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्याबद्दल नोटीस बजावली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या स्पर्धा परीक्षांच्या निकालांनंतर या कोचिंग क्लासेसच्या जाहिरातीं प्रसारित झाल्या. यामध्ये ग्राहक संरक्षण कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या नियमांचं पालन केलं नसल्याचं प्राधिकरणाला आढळून आल्यामुळे या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

**मुख्यमंत्री सूचना**

राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत 1027 सेवा अधिसूचित केल्या आहेत. त्यापैकी 527 सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिसूचित सेवा पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभागांच्या प्रमुखाला दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना केल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विविध सामाजिक क्षेत्रांची वॉररुम बैठक पार पडली. या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचं कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा घेण्यात आला.

**व्ही.शांताराम पुरस्कार-मुंबई**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या व्ही. शांताराम जीवन गौरव या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी यावर्षी नामवंत अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माते महेश मांजरेकर यांची निवड करण्यात आली आहे. 10 लाख रुपये, स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि चांदीचं पदक असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

तर, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना जाहीर करण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल मुंबईमध्ये पत्रकार परिषदेत या पुरस्कारांची घोषणा केली. हिंदी चित्रपट सृष्टीतील योगदानासाठी दिला जाणारा दिवंगत राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम खेर यांना तर, राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगण यांना जाहीर करण्यात आला आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर भीमराव पांचाळे यांनी व्यक्त केलेली ही प्रतिक्रिया.....

**ताल आहे गझलाचा, जायचे आहे पुढे, हे मराठी गझल वैभव न्यायचे आहे पुढे. आपल्या गझल ला रसिकांनी भरभरून दाद द्यावी, आपली मराठी गझल पुढे जावी, या आशेने आणि याच अपेक्षेने सुरू केलेला हा 52**

**वर्षांचा माझा प्रवास, आयुष्य समृद्ध करणारा माझा प्रवास, आणि आज त्याला मिळालेले हे एवढं भव्य दिव्या फळ ज्यांच्या गाण्याने जगण्याचं जीवनाचे भरण पोषण केलं. त्या लता दादींच्या नावाचा हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाने मला दिला या सारखा आनंदाचा क्षण माझ्या आयुष्यात दुसरा नाही. आणि पुरस्कार हा सन्मान मी जीवन देणाऱ्या बाबा साहेबांना, गझल देणाऱ्या मराठी गझलचं खलिफा सुरेश भटांना, आणि उचंबळून दाद देणाऱ्या रसिकांना अर्पण करतो.**

या सर्व पुरस्कारांचं वितरण येत्या 25 एप्रिलला मुंबईत भव्य समारंभात करण्यात येणार आहे. दरम्यान राज्य घटनेचा अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने सांस्कृतिक कार्य विभागानं 20 एप्रिलला मुंबईत गेटवे ऑफ इंडिया परिसरात सांगीतिक मानवंदना कार्यक्रमही आयोजित केला आहे.

**<u>काँग्रेस निदर्शनं</u>**

केंद्र सरकार ईडी, सीबीआयचा गैरवापर करून विरोधी पक्षांना संपवण्याचा; त्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधातील ईडीची कारवाई ही राजकीय हेतूने केली असल्याची टीका त्यांनी केली. कॉंग्रेसच्या वतीने काल दादर इथं इडीच्या कारवाईविरोधात आंदोलन करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार विजय वडेट्टीवार यांच्यासह पक्षाचे खासदार, आमदार, पदाधिकारी उपस्थित होते. गडचिरोली आणि धारशिव इथंही काँग्रेसच्या वतीनं काल ईडीच्या या कारवाईविरोधात आंदोलन करण्यात आलं.

**<u>गुडफ्रायडे</u>**

'गुड फ्रायडे' निमित्ताने आज प्रभू येशूख्रिस्ताच्या बलिदानाचं जगभरात स्मरण केलं जात आहे. हा दिवस ख्रिश्चन धर्मीयांमध्ये शोक, चिंतन आणि आध्यात्मिक भक्तीचा मानला जातो. या दिवसानिमित्त चर्चमध्ये विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आल्या आहेत.

**<u>MPSC</u>**

महाराष्ट्र लोक सेवा आयोगानं राज्यसेवा मुख्य परीक्षा 27 ते 29 मे दरम्यान घेण्याचा निर्णय घेतला आहे. या आधी या परीक्षा 26 ते 28 एप्रिल दरम्यान घेण्याचं नियोजन करण्यात आलं होतं. मात्र तयारीला कमी वेळ मिळाल्याचं कारण देत काही उमेदवारांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. ती मागणी विचारात घेऊन ही परीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>भाभा बालवैज्ञानिक-नागपूर</u>**

2024-25 या शैक्षणिक वर्षाकरिता इयत्ता सहावी आणि नववी या इयत्तांमधील विद्यार्थ्यांसाठी देशभरातील आठ केंद्रावर नुकत्याच घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत, नागपूरच्या स्पृहा शिनखेडे हिने सुवर्णपदक पटकावल आहे. या स्पर्धेच्या चारही फेऱ्यांमध्ये तिने उत्तम यश मिळवले. मुंबईत नुकत्याच 12 एप्रिलला पार पडलेल्या अंतिम फेरीत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदकं आणि शिष्यवृत्ती देण्यात आली.

**<u>पुरस्कार</u>**

राज्य सरकारतर्फे 2022-23 आणि 2023-24 या वर्षासाठी दिल्या जाणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचं वितरण आज पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरण होईल. क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल या समारंभाच्या तयारीची पहाणी केली. 2022-23 वर्षासाठी 70 पुरस्कारांची तर 2023-24 वर्षासाठी 89 पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

**आयपीएल**

आय पी एल टी क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या साखळी सामन्यात मुंबई इंडियन्स संघाने सनरायझर्स हैदराबाद संघाचा चार गडी राखून पराभव केला. मुंबईतील वानखेडे मैदानावर झालेल्या या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद संघाने दिलेल्या 163 धावांच्या लक्ष्य मुंबई इंडियन्स संघाने, 18 षटकं आणि 1 चेंडूत, 6 गडी गमावून पार केलं.

**हवामान**

मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी आज उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार**